॥ विद्या परम दैवतम ॥

ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ
द्वारा संचालित
# डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

खत्री महाविद्यालयात शिक्षण यात्रा कार्यक्रम संपन्न
(का.प्र.)
स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात मा. शिक्षणाधीकारी, चंद्रपूर यांच्या वतीने "शिक्षण यात्रा" कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन ॲड. दिपक चटप, ब्रिटीश सरकारची चेवेनी शिष्यवृत्ती प्राप्त वकील, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. फटिंग सर, समन्वयक श्री. अविनाश पोईनकर, डॉ. शरयु कटकमवार तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक डॉ. टि. एम. शेख यांची प्रामुख्याने मंचावर उपस्थिती होती. प्रमुख मार्गदर्शक ॲड. दिपक चटप विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की, माझ्यासारखा खेड्यातला एक विद्यार्थी साता समुद्रापलीकडे लंडन मध्ये जाऊन शिक्षण घेऊ शकतो तर तुम्ही देखील जाऊ शकता. ही कोशीश, हे प्रयत्न तुम्हाला करावे लागेल हा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हि शिक्षण यात्रा आहे. केवळ देगा हरी म्हणुन चालनार नाही तर त्या संधीपर्यंत आपल्याला पोहचावे लागेल.
या दृष्टीकोनातुन त्यानी विविध शिष्यवृत्ती संबंधी सविस्तर आणि सखोल असे मार्गदर्शन केले. समन्वयक श्री. अविनाश पोईनकर यांनी देखील विविध उदाहरणे देऊन मौलीक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे म्हणाले की ॲड. दिपक चटप हे आपल्या महाविद्यालयातील ११ वी व १२ वी चे विद्यार्थी आहेत. त्यांनी अतीशय परीश्रमातुन आणि मेहनतीतुन जे यश प्राप्त केले ही महाविद्यालयासाठी अभिमानाची आणि स्वाभीमानाची गोष्ट आहे, आपणही पुढे असे यश संपादन कराल ही सदिच्छा बाळगतो.
कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ. ज्योत्सना मोहीतकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. टि. एम. शेख यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची चांगली उपस्थिती होती.




डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
॥ शिक्षण यात्रा ॥
"EDUCATION TO EMPOWERMENT"
DR. KHATRI MAHAVIDYALAYA




डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
॥ शिक्षण यात्रा ॥
"EDUCATION TO EMPOWERMENT"